महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ

Maharashtra State Board of Secondary & Higher, Pune Divisional Board, Pune - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722

DIVISIONAL SECRETARY 25536781 / 82 / 83 25536712

FAX - 020 / 25536761
E-MAIL sscboardpune@gmail.com

क्र.पुविम/ओ-१ /10331
पुणे - ४११००५
दिनांक :-०२/०३/२०२१

प्रति,

संपर्क केंद्रप्रमुख / मुख्याध्यापक,
खाजगी विद्यार्थी इ.१० वी मार्च २०२१

**विषय** :- माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षा मार्च २०२१ च्या परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शिबिराबाबत.

**संदर्भ** :- राज्यमंडळ / परीक्षा - ३ / १०७९ / दिनांक २७/०२/२०२१ चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भ पत्रानुसार कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा एप्रिल - मे २०२१ च्या परीक्षेसांठी खाजगीरित्या प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दरवर्षीप्रमाणे संपर्क केंद्रावर शैक्षणिक शिबिर आयोजित करण्यात येते. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या स्वाध्याय पुस्तिका आपणास पुरविण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने संपर्क केंद्रावर आयोजित करावयाच्या शैक्षणिक शिबिराचा कालावधी खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे.

१) शनिवार दिनांक ०६/०३/२०२१ व रविवार दिनांक ०७/०३/२०२१
२) शनिवार दिनांक १३/०३/२०२१ व रविवार दिनांक १४/०३/२०२१
३) शनिवार दिनांक २०/०३/२०२१ व रविवार दिनांक २१/०३/२०२१
४) शनिवार दिनांक २७/०३/२०२१ व रविवार दिनांक २८/०३/२०२१
५) शनिवार दिनांक ०३/०४/२०२१ व रविवार दिनांक ०४/०४/२०२१

उपरोक्तप्रमाणे एकुण १० दिवसांच्या कालावधीमध्ये संपर्क केंद्रावर माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१० वी) एप्रिल - मे २०२१ च्या परीक्षेसाठी प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांसाठी सुधारित मूल्यमापन योजना विचारात घेवुन शैक्षणिक शिबिर आयोजित करून खाजगी विद्यार्थ्यांच्या संदर्भातील प्रकल्प कार्य, प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत मुल्यमापन,श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज पूर्ण करावे.तथापि यासंदर्भात केंद्रस्तरावर अडचण निर्माण होत असल्यास संपर्क केंद्राच्या सोयीनुसार एक/दोन दिवसाच्या कालावधीमध्ये आवश्यक असल्यास बदल करून शैक्षणिक शिबीर आयोजित करण्यात यावे. कोविड-१९ विषाणूच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषतः आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सुचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विभागीय मंडळ कार्यालयास तात्काळ सादर करावा.

विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ
पुणे-४११००५

17 No 2020